माध्यमिक शाळांत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे या योजनेत सुधारणा करण्याबाबत.

------------

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. इबीसी-१०९४/प्र.क्र.१०९/मावक-२.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १७ ऑगस्ट, १९९५.

वाचा:- शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र.इबीसी-१०६६/५४७८७/जे, दिनांक २९.८.१९६६.

प्रस्तावना:- माध्यमिक शाळांत हुशार, गुणवत्तापूर्ण मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी या योजनेखाली शाळेतील प्रत्येक इयत्तेमधून ५०% हून अधिक गुण मिळविणा-या पहिल्या २ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. १० वीच्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य दिले जावून निधीच्या उपलब्धतेनुसार ५ वी पर्यन्त क्रमाक्रमाने योजनेची व्याप्ती वाढविली जाते. या योजनेनुसार सध्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी ही शिष्यवृत्ती अत्यंत अल्प प्रमाणात दिली जाते, याचा विचार करुन सध्याच्या शिष्यवृत्तीच्या दरात बदल करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:- या योजनेचा विचार करुन सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या शिष्यवृत्ती योजनेच्या नियमावलीप्रमाणे सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्तीच्या दरात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| इयत्ता ५ वी ते ७ वी | - | रु.२०/- द.म. [१० महिने, जून ते मार्च] |
| इयत्ता ८ वी ते १० वी | - | रु.४०/- द.म. [ --"-- ] |

२. या बाबीवरील होणारा खर्च "मागणी क्र.एन-७ २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, [xx] ०१-अनुसूचित जातींचे कल्याण-२७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना [बी] महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१, च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने, ४१-सहाय्यक अनुदाने [२२२५ ०५४ ८] [विघयो], व. ०३-मागासवर्गीयांचे कल्याण, २७७-शिक्षण [एक] निरधीसूचीत जमाती व भटक्या जमाती यांचे कल्याण, [बी] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या

अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, ४१-सहायक अनुदाने [२२२५ ०८९ ८]" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येवून हा खर्च यासाठी प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सन १९९५-९६ या वर्षाकरिता येणारा खर्च वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन शासन ज्ञापन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.बीजीटी-१०९५/प्र.क्र.३२/अर्थसंकल्प, दिनांक ८.८.९५ अन्वये मंजूर अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३६३/९५/व्यय-११, दिनांक १२.६.९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ज.आ. पोकळे]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२[लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी.
निवड नस्ती, मावक-२.

परिशिष्ट - अ

शिष्यवृत्ती योजनेची नियमावली

१] शिष्यवृत्ती योजना मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक शाळेतील इ. ५ वी ते. १० वी च्या वर्गामध्ये शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी आहे.

२] ही योजना सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात येईल.

३] सदरहूची शिष्यवृत्ती मागील वार्षिक परीक्षेत कमीत कमी ५०% गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्रधान मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल.

४] सदरहूची शिष्यवृत्ती प्रत्येक इयत्तेतील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांस मंजूर करण्यात येईल.

५] या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट राहणार नाही.

६] शिष्यवृत्ती ही मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेतील नियमित हजेरी, समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक असल्यास मंजूर करण्यात येईल.

७] ही शिष्यवृत्ती इ. ५ वी ते ७ वी या वर्गामध्ये शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना द.म. रु. २०/- प्रमाणे [१० महिने], इ. ८ वी ते १० वीच्या वर्गात शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना द.म. रु. ४०/- प्रमाणे [१० महिने] मंजूर करण्यात येईल.

८] ही शिष्यवृत्ती दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या कालमर्यादेपुरतीच म्हणजेच जून ते मार्च या १० महिन्यांसाठी मंजूर करण्यात येईल.

९] ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

१०] ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक शाळांकडून गुणवत्ताप्रधान मागासवर्गीय विद्यार्थ्यांची माहिती मागविण्यात येईल.

११] सदरहूची शिष्यवृत्ती समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद मंजूर करतील.

/ व मागील वार्षिक परिक्षेत कमीत कमी ५०% गुण मिळवून
प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण होणा-या पहिल्या दोन